महानगर पालिका शिक्षण मंडळ, ठाणे
आवक नंबर - ६४३
दिनांक - ७।७।९९

प्रति,
मा.अध्यक्ष --- सेक्रेटरी
कला सुगंध मंडळ, माजिवडा,
ठाणे.

विषय :- कला सुगंध मंडळ संचलित नवजीवन प्राथ. विद्यामंदि
माजिवडा, ठाणे.
संदर्भ :- क्र./शिउसं/प्राथ-२/नावि/३५७२५/२६,
दिनांक - १६/१०/१९९८.

महोदय,

वरील विषयचे संदर्भानुसार कळविण्यात येते की, आपल्या कला सुगंध मंडळ माजिवडा, ठाणे. या संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेल्या मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळेस सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंत ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळ ठराव क्रमांक १२९ दि. ३१/५/९९ अन्वये पुढील अटींवर मा. शिक्षण उपसंचालक नाशिक यांचे अंतिम मान्यतेच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरूपाची कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात येत आहे.

१) संस्था सदर शाळा कायम विना अनुदान तत्वावर चालविण्यस आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहिजे.
२) संस्थने शाळेसाठी शासनाने विहीत केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ अन्वये विहीत केलेल्या अटींनुसार जागा / शैक्षणिक साहित्य आणि इतर भौतिक सुविधांची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहीत केलेल्या नियमानुसार विहीत केलेल्या दराने वेतन व भत्ते दिले पाहिजेत.
३) संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे वर्गातील विदयार्थ्यांची संख्या, विदयार्थ्यांचे प्रवेश व मासिक फी इत्यादि काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
४) संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे.
५) शासनाच्या सर्व नियमांचे पालन केले पाहिजे न झाल्यास मान्यता काढून घेण्यात येईल.
६) शिक्षण खात्याचे कोणीही अधिकारी शाळेचे कोणतेही रेकॉर्ड पाहण्यास मागतील तेव्हा ते रेकॉर्ड पाहण्यास मागतील तेव्हा ते रेकॉर्ड उपलब्ध करून दिले पाहिजे.
७) शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय मासिक फी चे वाढीव दर आकारता कामा नये.